# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) जुलै–ऑगस्ट २०२४ पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबत

### ॥ प्र क ट न ॥

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत जुलै–ऑगस्ट २०२४ मध्ये घेण्यात येणारी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) पुरवणी परीक्षा दि. १६/०७/२०२४ ते दि. ३०/०७/२०२४ आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षा दि. १६/०७/२०२४ ते दि. ०८/०८/२०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर परीक्षेचे वेळापत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात आलेले आहे तथापि दि. २६/०७/२०२४ रोजी राज्याच्या काही जिल्हयांमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला आहे.

त्यामुळे दि. २६/०७/२०२४ रोजी होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेच्या वेळापत्रकामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

**माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) पुरवणी परीक्षा**

| वेळापत्रकामध्ये निश्चित केलेला तपशील<br>वार, दिनांक, सत्र, वेळ व विषय | वेळापत्रकाबाबत सुधारित तपशील<br>वार, दिनांक, सत्र, वेळ व विषय |
|---|---|
| शुक्रवार दि. २६ जुलै, २०२४<br>सकाळ सत्र– ११.०० ते १.००<br>विषय– विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग२- (72-2) | बुधवार दि. ३१ जुलै, २०२४<br>सकाळ सत्र– ११.०० ते १.००<br>विषय– विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग२- (72-2) |

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षा**

| वेळापत्रकामध्ये निश्चित केलेला तपशील<br>वार, दिनांक, सत्र, वेळ व विषय | वेळापत्रकाबाबत सुधारित तपशील<br>वार, दिनांक, सत्र, वेळ व विषय |
|---|---|
| शुक्रवार दि. २६ जुलै, २०२४<br>सकाळ सत्र– ११.०० ते २.००<br>विषय– वाणिज्य संघटन व व्यवस्थापन (51)<br>विषय– अन्नशास्त्र व तंत्रज्ञान (62)<br>विषय– एम.सी.व्ही.सी. पेपर–२–EB to XB=20 विषय | शुक्रवार दि. ०९ ऑगस्ट, २०२४<br>सकाळ सत्र– ११.०० ते २.००<br>विषय– वाणिज्य संघटन व व्यवस्थापन (51)<br>विषय– अन्नशास्त्र व तंत्रज्ञान (62)<br>विषय– एम.सी.व्ही.सी. पेपर–२–EB to XB=20 विषय |

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षा जुलै–ऑगस्ट २०२४ लेखी व अन्य परीक्षेच्या उर्वरित वेळापत्रकामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तरी वेळापत्रकातील उपरोक्त बदलाची सर्व संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, विद्यार्थी, पालक व अन्य घटक यांनी नोंद घ्यावी.

दिनांक–२५/०७/२०२४

(मेधा निरफराके)
सहसचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

क्र.नाविमं/उ.मा./माध्य/ 1218
नाशिक ४२२००३
दि.२५/०७/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त शाळा कनिष्ठ महाविद्यालय,
नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार

उपरोक्त राज्य मंडळाच्या प्रकटनानुसार कळविण्यात येते कि, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) जुलै-ऑगस्ट २०२४ पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबत नोंद घेऊन आपल्या शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयातील दिनांक २६/०७/२०२४ रोजीच्या पेपरला प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना याबाबत आपले स्तरावरून सूचित करण्यात यावे.

(मोहन देसले)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक ४२२००३

SSC B1